**जाहीर निविदा**
**चिपळूण नगर परिषद**
**(नगर परिषदेचे संकेतस्थळ देखभाल करणे व अँटी व्हायरस पुरविणे)**

चिपळूण नगर परिषदेची संकेतस्थळाची वार्षिक दर पध्दतीने देखभाल करणेकामी सेवा पुरवावयाची आहे. तसेच अँटी व्हायरस पुरवावयाचे आहेत. याकामाची उक्त रक्कम रूपयेची सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत. सिलबंद निविदा दोन लखोटा पध्दतीने मागविणेत येत आहेत. इच्छुक संस्था/व्यक्ती/कंपनी यांनी त्यांच्या, विहीत नमुन्यांतील सिलबंद निविदा दिनांक ०८/०९/२००९ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत सर्वसाधारण विभागातील प्रशासकीय अधिकारी यांचे दालनातील निविदा पेटीमध्ये टाकाव्यात.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा फॉर्मची रक्कम | निविदा सोबत डी. डी. ने भरावयाची इसारा रक्कम | निविदाकारांची पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| १ | चिपळूण नगर परिषदेचे संकेतस्थळ नुतनीकरण करणे व वार्षिक दर पध्दतीने देखभाल करणेकामी सेवा पुरविणे | १००/- | २,०००/- | विविध शासकीय व खाजगी वेबसाईट विकसित केल्याचा अनुभव, दुकाने परवाना, कंपनी प्रोफाईल. |
| २ | अॅटी व्हायरस १२ युझर्सचे तीन वर्षे मुदतीचे | १००/- | २,०००/- | दुकाने परवाना, अनुभवाचा दाखला. पुरवठादार अँटी व्हायरस कंपनीचा अधिकृत वितरक असल्याचा दाखला. |

१. निविदा फॉर्म मिळण्याची शेवटची तारीख ०५/०९/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यत.
२. निविदा तारीख ०८/०९/२००९ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मुख्याधिकारी यांचे कक्षामध्ये उपस्थित मक्तेदार याचे समक्ष उघडण्यात येतील.
३. उशीरा आलेल्या पोष्टाने/कुरीयरने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.
४. कामासंबधी माहिती नगर परिषद संगणक विभागात पहावयास मिळेल. सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेच्या नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.
५. कोणतेही निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचे अधिकार राखून ठेवणेत येत आहेत.

दिनांक : २७/०८/२००९

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद, चिपळूण

टीप : सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे **www.cmcchiplun.org** या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

**चिपळूण नगर परिषद, चिपळूण**

**नगर परिषदेला संकेतस्थळ नुतनीकरण करणे व वार्षिक दर पध्दतीने देखभाल करणेकामी सेवा पुरविणे व अँटी व्हायरस पुरविणेसंबधी अटी व शर्ती.**

१. नगर परिषदेचे संकेतस्थळ वार्षिक दर पध्दतीने देखभाल करणेकामी सेवा पुरवठा धारकाने निवीदा मंजूर झाल्यावर योग्यतो करारनाम्याप्रमाणे करारनामा करावयाचा आहे. त्यासोबत अनामत म्हणून देकारांचे रक्कम चिपळूण नगर परिषद यांचे नांवे डी.डी. अथवा ठेव स्वरुपांत भरावयाची आहे. (ठेव किमान १ वर्षे मुदतीची असणे आवश्यक आहे.)

२. नगर परिषदेचे संकेतस्थळ १ वर्षे कालावधीसाठी देखभालकामी सेवा पुरविणेची आहे. सेवा कालावधीमध्ये होणारे बदल नगर परिषदेच्या मागणीनुसार करून देणेचे आहेत.

३. अ.क्र. २ मध्ये नमुद केलेले अँटी व्हायरस नगर परिषदेच्या विविध विभागातील संगणकाला इन्स्टॉलेशन करणे, व त्याची कनेक्टीव्हीटी करणे व प्रत्येकवेळी इंटरनेटद्वारे अपडेट होण आवश्यक आहे.

४. नगर परिषदेचे संकेतस्थळाचे डोमेन नेम नुतनीकरण, वेबस्पेस नुतनीकरण, ई-मेल स्पेश नुतनीकरण व वार्षिक दर पध्दतीने देखभाल करावायाची आहे.

५. सेवा पुरवठा धारकाला देकार प्रमाणे दरमहा ठोक रक्कम चेकने देणेत येईल.

६. शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयाचे संकेतस्थळ विकसीत केलेल्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

७. नगर परिषदेचे संकेतस्थळामध्ये नगर परिषदेने सुचविलेले बदल हे सेवा पुरवठादार यांनी नगर परिषदेचे संकेतस्थळामध्ये तात्काळ करून द्यावयाचे आहेत.

८. नगर परिषदेचे संकेतस्थळामध्ये वेळोवेळी करावयाचे आवश्यक सुचना/बदलकामी मुख्याधिकारी यांच्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

९. दर महिन्याला कामासंबधी अहवाल लिपीक, संगणक विभाग यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

१०. नगर परिषदेचे संकेतस्थळामध्ये देखभालकामी सेवा पुरवठादार यांनी नगर परिषदेचे संकेतस्थळाकरीता असणारे सोर्सकोड प्रत्येक वर्षी अद्ययावत करून मुळ प्रत व छायांकीत प्रत (हार्ड व सॉफ्ट कॉपी) देणे बंधनकारक आहे.

११. नगर परिषदेचे संकेतस्थळामध्ये देखभालकामी सेवा पुरवठादार यांचे कामासंबधी कोणताही वाद उत्पन्न झाल्यास याबाबत नगर परिषदेचा निर्णय अंतीम व बंधनकारक असेल.

१२. नगर परिषदेचे संकेतस्थळामध्ये देखभालकामी सेवा पुरवठादार यांनी सेवा

पुरवताना हलगर्जीपणा केल्यास त्याबाबत जास्तीत जास्त दोनवेळा सुधारणा करणेबद्दल संधी देणेत येईल व त्यानंतर सुधारणा न झाल्यास एकतर्फी ठेका रद्द करणेचा नगर परिषदेला अधिकार असेल. व त्यामुळे होणारे नगर परिषदेचे नुकसान ठेकेदारांची अनामत अथवा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक शहरे अधिनियम १९६५ चे कलम १५०, १५१, १५२, १५३ प्रमाणे वसुलीची कार्यवाही करणेत येईल.

१३. सेवा पुरवठाधारकाला निवीदा देकाराव्यतिरिक्त कोणताही शासकिय कर बिलावर आकारता येणार नाही. तसेच अन्य कोणत्याही प्रकारचे आवश्यक ते शासकीय अथव अन्य परवाने सेवा पूरवठाधारकाने स्वतः घेणेचे आहेत. याबाबतीत कोणतीही कायदेशीर बाबीसाठी नगर परिषद जबाबदार असणार नाही.

१४. नगर परिषदेचे संकेतस्थळामध्ये देखभालकामी सेवा पुरवठाधारकाला कालावधी दिनांक ११/०८/२००९ ते दिनांक १०/०८/२०१० पर्यत १ वर्षचा असेल.

१४. निविदा देकार मंजूर झाल्यास सेवा पुरवठाधारकाला योग्य मुद्रांकावर करारनामा करुन घ्यावा लागेल. करारनाम्यातील अटी व शर्ती सेवा पुरवठाधारकावर बंधनकारक असतील.

१५. सेवा पुरवठा धारकाचे कामाचे पर्यवेक्षण लेखा परिक्षक करतील तसेच सेवांचे मुल्यांकन मुख्याधिकारी यांचेमार्फत केले जाईल.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

वरील अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक व मान्य असल्याबद्दल मी खाली सही करीत आहे.

निविदा धारकांची सही
कंपनी /संस्था असल्यास
त्यांचा रबर स्टॅम्प आवश्यक